**नि.फौ.ख.क्रं. ४७/२०१८** **निशाणी क्र. ११**
**शासन .वि. परशराम पराते**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०४ ची शपथेवर जबानी

.......

**माझे नांव** – आशिष अशोकराव मोडक
**वय** – ३९ वर्षे, धंदा – नोकरी,
**राहणार** – सिंदी मेघे, ता. व जि. वर्धा.

.......

**सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत**

**१.** मी आरोपीला ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. मी अंधश्रद्धा निरमुलन समितीच्या कार्यकर्ता म्हणून आरोपीच्या घरी गेलो होतो. फिर्यादी व माझी वर्धेमध्ये भेट झाली होती. त्यांनी मला सांगितले की, हमदापूर परिसरामध्ये बिबटया आल्याचे माहितीवरुन ते तेथे गेले असता त्यांना तेथील लोकांकडुन आरोपी हा कंबरदुखीसाठी उपचार करत असल्याचे समजले. त्याप्रमाणे ते आरोपी कडे उपचाराकरिता गेले होते. तेथे आरोपीने त्यांना कुठलाही उपचार न करता एका हातात फुल व एका हातात दगड देउन त्यांना सांगितले की, जे हात जड आहे त्या वजनामुळे त्याच्यावर करनी करण्यात आल्याचे आरोपीने सांगितले आणि त्यांच्याकडुन आरोपीने २००/– रुपये फिस घेतली होती. तसेच तावीज व अंगठी बनविण्यासाठी पुढच्या वेळी ३००/– रुपये घेउन येण्यास सांगितले. परंतु फिर्यादीला काही फरक न पडल्यामुळे ते माझ्या कडे आले व सर्व गोष्ट त्यांनी आम्हाला सांगितले. त्यावरुन आम्ही अंधश्रद्धा निरमुलन समितीच्या कार्यकर्ता म्हणून त्यांना आरोपीविरुद्ध फिर्याद देण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस कर्मचारी, फिर्यादी व आम्ही सर्व अंधश्रद्धा निरमुलन समितीचे पदाधिकारी आरोपीच्या घरी हमदापूर येथे गेलो. तेथे उपचाराकरिता काही नागरिक आलेले होते. तेथे पूजाअर्चासाठी लागणारे साहित्य जसे की, लिंबू, करदोडा, फुल, बुक्का व कापूर इत्यादि आम्हाला आढळुन आले व असे दिसले की, तेथे कोणताही प्रकारचा उपचार होत नाही. त्यावरुन आम्हाला तेथे भोंदूगिरीचा प्रकार चालू आहे असे दिसले. त्यानंतर पोलीसांनी

तेथील सर्व साहित्य जप्त केले व आरोपीला ताब्यात घेतले. जप्त केलेल्या साहित्य मी पाहिल्यास ओळखु शकतो. फिर्यादी हे माझ्या कडे सन २०१७ च्या मार्च महिन्याचा शेवटी आले होते.

**सरतपास संपला**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ आर.व्ही.मुन यांच्या मार्फत :**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी सोबत सुरुवातीला काय झालं याबाबत मला माहिती नाही कारण मी त्यावेळी त्यांच्या सोबत नव्हतो. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. मी पोलीसांना बयान देते वेळी फिर्यादीला कंबरदुखीचा त्रास आहे असे सांगितले होते परंतु सदरचा मजकूर माझ्या बयानात का नमूद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. आरोपीच्या घरी आम्ही एप्रील, २०१७ मध्ये गेलो होतो व त्यानंतर कधी ही आरोपीच्या घरी गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुजाअर्चासाठी लागणारे साहित्य सर्वाकडे असते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासात सांगितलेले सर्व साहित्य सर्वाचे घरी असते व अक्षेपार्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या घरी कधी गेलो नाही व सर्व माहिती आज रोजी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी फिर्यादी व अंधश्रद्धा निरमुलन समितीच्या पदाधिका–यांचा सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.11.20 17:01:56 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : २०/११/२०२५